# निवेदन

**क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते । –कालिदास.**

महाराष्ट्र शब्दकोशाचें कार्य १९२८ मध्यें सुरु होऊन त्याचा अखेरचा म्हणजे सातवा विभाग १९३८ अखेर छापून बाहेर पडला. हे सात विभाग संपादन करण्याकरितां व शब्दांचें संकलन करण्याकरितां संपादकवर्ग सर्व महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्र यांमध्यें प्रवास करून आला. तत्कालीन उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा व ज्या भाषाप्रेमी लोकांनीं या कार्यास साहाय्य केलें त्यांच्या साहाय्याचा पूर्ण लाभ घेऊन शक्य तों हा कोश सर्वसंग्राहक व्हावा अशा तऱ्हेचा प्रयत्न करण्यांत आला.

महाराष्ट्र शब्दकोशाचे सातहि विभाग छापून होत असतां एकीकडे शब्दसंग्रहाचें काम चालूच होतें. मात्र मुद्रणास सुरुवात झाल्यानंतर संपादकवर्गास या कार्याकरितां पुण्याबाहेर जाणें अशक्य झालें व केवळ मुद्रणाकरितां अवश्य तेवढें द्रव्य मिळविण्याकरितांच काय तें प्रचाराचें अथवा प्रवासाचें काम करणें शक्य झालें. तथापि कचेरीमध्यें नवीन नवीन उपलब्ध होणारे व कोशाच्या दृष्टीनें महत्त्वाचे ग्रंथ वाचून शब्द निवडण्याचें काम चालूच होतें.

महाराष्ट्र शब्दकोश तयार करीत असतां गोळा झालेल्या सर्व म्हणी व वाक्प्रचार यांचा अन्तर्भाव शब्दकोशांत करतां येणें शक्य झालें नाहीं. महाराष्ट्र शब्दकोशाच्या सातव्या विभागाच्या प्रस्तावनेंत असें म्हटलें आहे कीं, 'म्हणींचा संग्रह जरी विस्तृत प्रमाणांत करतां आला तरी विशिष्ट शब्दाचा विशेष अर्थ देण्याच्या कामीं उदाहरणादाखल जेथें उपयोग झाला तेथेंच म्हणींचा अंतर्भाव कोशांत झाला. पण साध्या 'अति राग भीक माग', 'भटो लग्न करा तर म्हणे तुम्हीच बाईल व्हा', 'राजाला दिवाळी माहीतच नाहीं' अशा प्रकारच्या म्हणी प्रत्यक्ष कोशांत अन्तर्भूत झाल्या नाहींत. याकरितां जमलेल्या साहित्यांत भर घालून म्हणींचा व वाक्प्रचारांचा एक स्वतंत्र कोश करावयाचा विचार आहे.' त्याप्रमाणें 'वाक्संप्रदाय कोश' नांवाचा दोन विभागांमध्यें स्वतंत्र कोश प्रसिद्ध करण्यांत आलेलाच आहे; तो तयार करीत असतां व त्याच्याबरोबरच शास्त्रीय परिभाषा कोश तयार करीत असतां फुरसुतीच्या वेळीं नवीन नवीन उपलब्ध होणाऱ्या किंवा विशेष महत्त्वाच्या ग्रंथांचें वाचन चालूच होतें. उदाहरणच द्यावयाचें तर पेशवे दप्तराच्या समग्र ग्रंथांचें वाचन एकवार करण्यांत आलें; तसेच राजवाड्यांचे ऐतिहासिक साधनांचे सर्व खंड पुन्हां एकदां वाचण्यांत आले; भारतवर्ष मासिकाचे अंक वगैरे साहित्यहि एकवार प्रत्यक्ष नजरेखालून घालण्यांत आलें. या ग्रंथांतील कांहीं शब्द व अवतरणें मूळ कोशांत आलेलीं होतींच; तथापि या पुरवणीमध्येंहि आपणांस या ग्रंथांतील बरेच शब्द आढळतील. त्याप्रमाणेंच मुधोळ येथील राजघराण्याचा इतिहास या ग्रंथाच्या शेवटीं दिलेल्या शब्दसूचीचा उपयोग या पुरवणीकरितां करण्यांत आला. या सूचींत बरेचसे शब्द अरबी फारसी आहेत ही गोष्ट आमच्या लक्ष्यांत आल्याशिवाय राहिली नाहीं; पण त्यांतले बरेचसे शब्द ऐतिहासिक कागदपत्रांत वरचेवर आढळतात व मुधोळचा इतिहास हा मराठी भाषेंतच लिहिलेला ग्रंथ असून त्यांत आढळणारे शब्द जे इतरत्रहि आढळून येतात ते मराठी भाषेच्या कोशांत, मग ते मूळ परकी असले, तरी येणें अवश्य आहे असेंच आम्हांस वाटतें. आदिलशाही फर्मानें या ग्रंथाच्या शेवटची यादीहि या कारणास्तवच या पुरवणींत अन्तर्भूत करण्यांत आली. मात्र हे सर्व शब्द मूळ त्या त्या भाषांच्या कोशांत ताडून पाहणें आम्हांस सवड व साधनें यांच्या अभावीं शक्य झालें नाहीं हें येथें नमूद करणें अवश्य आहे. महानुभावी वाङ्मयांतील बरेचसे शब्द जरी यवतमाळ येथील शारदाश्रमाच्या साहाय्यामुळें आम्हांस शब्दकोशांत देतां आले तरी जे पुष्कळच अधिक शब्द या पुरवणीकरितां आमचे महानुभाव पंथीय मित्र महंत गोपीराज यांनीं गोळा करून पाठविले त्यांचा अन्तर्भाव या ठिकाणीं केला आहे. हेहि शब्द आम्हांस मूळ ग्रंथांशीं ताडून पाहतां आले नाहींत. याप्रमाणेंच शब्दकोशाच्या प्रसिद्धीनंतर प्रकाशित झालेले श्री. वि. भि. कोलते संपादित आचार्य नरेंद्रकृत रुक्मिणी स्वयंवर तसेंच वऱ्हाडी लोकगीतें यासारख्या नवीन ग्रंथांतूनहि शब्द व अवतरणें यांचा संग्रह करण्यांत आला. या भागाकरितां वाचलेल्या ग्रंथांची सूची या विभागांत स्वतंत्रपणें दिली आहे तीवरून या नवीन परिश्रमांची कल्पना येईलच.

याखेरीज देवाचें गोठणें येथील श्री. साठे व संकेश्वर येथील श्री. कुळकर्णी, कै. श्री. अ. दा. केळकर व इतर कांहीं वाचक यांनीं नवे शब्द अवतरणांसहित दिले व शब्दकोशाचे निरनिराळे विभाग पाहून त्यांत न आढळणारे कांहीं शब्द आमच्याकडे पाठविले; त्यांचा अन्तर्भाव या कोशांत करण्यांत आला आहे. या सर्वांचे आम्ही आभारी आहों.

या पुरवणीकरितां महाराष्ट्र शब्दकोशांत न आढळणारे अगर चुकीचे अर्थ दिले गेलेले वगैरे शब्द आमच्या नजरेस आणावे अशाबद्दल वर्तमानपत्रांतून अनेकवार विनंति केली होती. परंतु वर उल्लेखिलेल्याशिवाय आम्हांस बाहेरून कोणाचें साहाय्य मिळालें नाहीं.

या पुरवणीबद्दलहि महाराष्ट्र शब्दकोशाच्या सातव्या विभागाच्या प्रस्तावनेंत 'कांहीं शब्द आम्ही पुरवणीकरितां जमविले आहेत तथापि आणखी कांहीं दिवस प्रयत्न झाल्यास नष्ट होण्याच्या मार्गास लागलेले हे शब्द संकलित होणें शक्य आहे,' असें आम्ही म्हटलें होतें. त्याप्रमाणें दहा वर्षांवर वाट पाहून व इतर संपादकीय कामें चालू असतांनाच शक्य तितका प्रयत्न करून शब्द गोळा झाले त्यांचा हा स्वतंत्र विभाग करून आम्ही महाराष्ट्रास सादर करीत आहों. यानंतरहि पुन्हां मूळ आणि पुरवणी शब्दकोशांत नसलेले इतर बरेच शब्द जमल्यास पुरवणी खंडाचा दुसरा विभाग काढतां येईल. या प्रकारचें कोशकार्य कधींच पुरें होत नसतें.

मध्यंतरीं कागद मिळण्याची व मुद्रण करण्याची अडचण अतिशय तीव्रतेनें जाणवली व त्यामुळें वाक्संप्रदाय कोश व शास्त्रीय परिभाषा कोश हे ग्रंथ तयार झाल्यानंतरहि अनेक वर्षांनीं छापले गेले. त्यामुळें इतका दीर्घकाल जुन्या सामग्रीवरच काढणें भाग पडल्यामुळें मंडळाची आर्थिक स्थिति अतिशय खालावली व अखेरीस कंपनीच्या रजिस्ट्रारचें पत्र आलें कीं, आपलें मंडळ आर्थिकदृष्ट्या खालावलेलें आहे त्याअर्थी आपण तें बंद करावें, नाहींतर आम्ही सरकारास तें बंद करण्याकरितां कळवूं. तेव्हां ता. ११ ऑक्टोबर १९४८ रोजीं भरलेल्या भागीदारांच्या सभेंत मंडळ स्वतः होऊन ऐच्छिक ( व्हॉलंटरी लिक्विडेशन ) पद्धतीनें विसर्जित करण्यांत यावें असा ठराव करण्यांत आला. त्याप्रमाणें महाराष्ट्र कोश मंडळ लिमिटेड ही संस्था आतां विसर्जित करण्यांत आलेली आहे.

याकरितां या खंडाचा छपाईचा वगैरे सर्व खर्च व्यक्तिशः श्री. दाते व श्री. कर्वे या संपादकद्वयानेंच सोसला आहे.

तसेंच हें कोशरचनेचें कार्य यापुढें चालू रहावें म्हणून संपादकद्वयानें सध्या आपल्या वैयक्तिक जबाबदारीवर 'कोश कार्यालय' ही संस्था स्थापून हें कार्य चालविलें आहे. सहा विभागांत पूर्ण होणाऱ्या **सुलभ विश्वकोशाच्या** संपादनावरून हें दिसून येईलच.

या संस्थेचें रूपांतर लवकरच एखाद्या भाषा-वाङ्मय संशोधन संस्थेंत करण्याचा चालकांचा विचार आहे व त्या मार्फत हें कोश रचनेचें व इतर भाषिक व सांस्कृतिक कार्य करण्याचा विचार आहे.

आतांपर्यंत ज्या महाराष्ट्रीय जनतेनें आम्हांस साहाय्य केलें ती यापुढेंहि आम्हास असेंच साहाय्य करून हें आमचें कार्य पुढेंहि चालू ठेवील अशी आशा आहे व ही आशा सफळ करण्याच्या कामीं आम्हास समर्थ करावें अशी त्या जगन्नियंत्याची प्रार्थना आहे.

**किंबहुना तुमचें केलें। शब्दकीर्तन हें सिद्धी नेलें।**
**येथ माझें जी उरलें। पाईकपण॥** –ज्ञानेश्वर.

**उरौ देवा अनिबाधे स्याम।**
–ऋग्वेद ५,४२,१७.

# महाराष्ट्र शब्दकोश

## [ पुरवणी विभाग ]

## ग्रंथसंक्षेप सूची

[ महाराष्ट्र शब्दकोश विभाग १ व ७ यांत दिलेल्या ग्रंथसंक्षेपांखेरीज ]

| संक्षेप | ग्रंथनाम, संपादक | खुलासा |
|---|---|---|
| अपुरा | अपुरा डाव–द. र. कवठेकर | पृष्ठ |
| अमर | अमरकोश–मराठी भाषांतर | ,, |
| अर्थ | अर्थ (पाक्षिक)–श्री. वा. काळे | तारीख महिना वर्ष |
| अस्पृ | अस्पृष्टांचा प्रश्न–श्री. म. माटे | पृष्ठ |
| अज्ञातच | अज्ञात चरित्र ( महानुभावी ) | ,, |
| आंघइ | आंग्रे घराण्याचा इतिहास–भट–ढबू | प्रकरण पृष्ठ |
| आठइ | आठल्ये घराण्याचा इतिहास | पृष्ठ |
| आडिमहा | आडिवऱ्याची महाकाली | ,, |
| आत्मवृत्त | आत्मवृत्त–धोंडो केशव कर्वे | ,, |
| आनंद | आनंद मासिक | तारीख महिना वर्ष |
| आपघइ | आपटे घराण्याचा इतिहास | पृष्ठ |
| आफ, आफर्मानें | आदिलशाही फर्मानें भा. इ. सं. मं. | अखेरची यादी |
| उ | उद्धवगीता ( महानुभावी ) | प्रकरण पृष्ठ |
| उभि, उत्तभिंति | उत्तरेकडील भिंती–काका कालेलकर | पृष्ठ |
| उद्यम | मासिक | महिना, वर्ष |
| उपेअंत | उपेक्षितांचें अंतरंग–श्री. म. माटे | पृष्ठ |
| एभारुड | एकनाथी भारुड | ,, |
| एलच, एशिआ | एका लष्करी शिपायाचें आत्मचरित्र–जनरल शिंदे | ,, |
| ऐपो | ऐतिहासिक पोवाडे–य. न. केळकर खंड २ रा | खंड, पृ. |
| ऐसं | ऐतिहासिक संग्रह | प्रकरण, पृष्ठ |
| कविमि | कविमित्र | ,, |
| कांम्हाम्हा | कांही म्हातारे व एक म्हातारी–वि. द. घाटे | पृष्ठ |
| कालिका | कालिका पुराण | अध्याय, ओवी |
| किर्लो | किर्लोस्कर मासिक | महिना, वर्ष |
| कीर्त | कीर्तन तरंगिणी | विभाग, पृष्ठ |
| केदाखं | केदार खंड–करंदीकर | पृष्ठ |
| केळआत्म | आत्मचरित्र–न. चिं. केळकर | ,, |
| खदे | खरा देशभक्त–वा. कृ. भावे | ,, |
| खेस्व | खेड्यांतील स्वराज्य–मो. गो. सोमण | ,, |
| गणपतराव जोशी | चरित्र–ल. ना. जोशी | ,, |
| गस्तो | ( महानुभावी ) स्तोत्र | ,, |
| गुजगो | गुजगोष्टी–ना. सी. फडके | ,, |

| संक्षेप | ग्रंथनाम, संपादक | खुलासा |
|---|---|---|
| गोव्या | कादंबरी-ना. धों. ताम्हनकर | पृष्ठ |
| गोराघ | गोखले रास्ते घराण्याचा इतिहास | ,, |
| गौरांग | गौरांग प्रभूचें चरित्र | ,, |
| चित्रकृषि | चित्रमय कृषीवल-मासिक | वर्ष पृष्ठ |
| चित्रवंचना | नाटक-वा. वा खरे | पृष्ठ |
| छच | विष्णुपंत छत्रे यांचें चरित्र-ना. कृ. गद्रे | ,, |
| जांस्व | जांबुवंती स्वयंवर | ,, |
| ज्योत्स्ना | ज्योत्स्ना-मासिक | महिना, वर्ष |
| टिच | टिळक चरित्र-न. चिं. केळकर. | विभाग पृष्ठ |
| डोंगरी | डोंगरी येथील तुरुंगांतील १०१ दिवस -गो. ग. आगरकर | ,, |
| तुल रामा | तुलसीदास कृत रामायण | ,, |
| त्रि, त्रिकाळ | त्रिकाळ-वर्तमानपत्र | तारीख महिना वर्ष |
| दुबारो | दुसरे बाजीराव रोजनिशी-वाड | पृष्ठ |
| दुमो | दुर्दैवी मोहरे | ,, |
| दुर्दैरं | दुर्दैवी रंगू-चिं. वि. वैद्य | ,, |
| देवी श्री अहिल्याबाई | चरित्र | ,, |
| धर्मा, धर्माजी | धर्माजी रावाचें कुटुंब | ,, |
| नकुलालंकार | काव्य-मा. त्र्यं. पटवर्धन | ,, |
| नरुस्व | नरेन्द्रकृत रुक्मिणी स्वयंवर-वि. भि. कोलते | ओवी |
| नवाकाळ | वर्तमान पत्र | तारीख महिना वर्ष |
| नाभोका | नागपूरकर भोसल्यासंबंधीचे कागद पत्र | पृष्ठ |
| नामगा | नामदेव गाथा | ,, |
| निबंधचंद्रिका | मासिक | वर्ष अंक |
| निवाडे | सनदापत्रें, निवाडे-ग. चिं. वाड | पृष्ठ |
| परशु | परशुराम चरित्र-श्री. म. माटे | ,, |
| पुद | पुरंदरे दप्तर-कृ. वा. पुरंदरे | भाग, पृष्ठ |
| पुरु | पुरुषार्थ मासिक-पं. सातवळेकर | महिना वर्ष |
| पेंकुवृ, पेंघ | पेंडसे कुलवृत्तान्त | पृष्ठ |
| पेम, पेशमहा | पेशवे कालीन महाराष्ट्र-वा. कृ. भावे | ,, |
| प्रतिभा | मासिक | महिना वर्ष |
| प्रतिआत्म | प्रतिनिधि आत्मचरित्र-भवानराव श्रीनिवासराव प्रतिनिधि | भाग, पृष्ठ |
| प्रभात | प्रभात-वर्तमान पत्र | तारीख महिना अंक |
| प्रश | प्रताप शस्त्रागार-माणिकराव | पृष्ठ |
| बदला | बदलापूर-ना. गो. चापेकर | ,, |
| बलवंत | बलवंत वर्तमानपत्र-रत्नागिरी | तारीख महिना वर्ष |
| बागोप | बापू गोखले पत्रव्यवहार-कृ. वा. पुरंदरे | पृष्ठ |
| बाबारो | बाळाजी बाजीराव रोजनिशी-ग. चिं. वाड | विभाग |
| बावडेदप्तर | बावडे घराण्याचें दप्तर | अंक पृष्ठ |
| भग्नमूर्ति | काव्य-आ. रा. देशपांडे | पृष्ठ |
| भवि | भक्तविजय-महिपति | अध्याय ओवी |
| भात | भारतीय तत्त्वज्ञान-न. चिं. केळकर | पृष्ठ |

| ग्रंथसंक्षेप | ग्रंथनाम, संपादक | खुलासा |
|---|---|---|
| भारतवर्ष | भारतवर्ष मासिक | प्रकरण पृष्ठ |
| भाको | भाऊराव कोल्हटकर चरित्र | पृष्ठ |
| भावबं | भावबंधन नाटक-रा. ग. गडकरी | ,, |
| भूभ्र | भूतावरील भ्रमण-य. न. केळकर | ,, |
| मइसा पया | मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें-पत्रें यादी वगैरे | ,, |
| मऐशि | मराठी ऐतिहासिक शिलालिपि-तंजावर येथील शिलालेख | ,, |
| मखे, मखेपु | मराठी खेळांचें पुस्तक-अ. वि. देवधर | ,, |
| मनो | मनोरंजन-मासिक-का. र. मित्र | महिना वर्ष |
| मन्वं | मन्वंतर-मासिक | महिना वर्ष |
| मरं, मरारंग | मराठी रंगभूमि-कुलकर्णी | पृष्ठ |
| मवाइ | मराठी वाङ्मयाचा इतिहास | ,, |
| मवि | मल्लविद्या-ल. ब. भोपटकर | पृष्ठ |
| मशा, मशाप | मराठी शालापत्रक | महिना वर्ष |
| मसाप | महाराष्ट्र साहित्य पत्रिका | वर्ष अंक |
| महा | महाराष्ट्र-मासिक | महिना वर्ष |
| महा | महाराष्ट्र वर्तमानपत्र | तारीख महिना वर्ष |
| महादजी चरित्र | महादजी शिंदे यांचें चरित्र | पृष्ठ |
| महाशा | महाराष्ट्र शारदा-मासिक | महिना वर्ष |
| मज्ञा | महाराष्ट्रीय ज्ञानकोश | अक्षर पृष्ठ |
| मातीर्थे | माझी तीर्थ यात्रा-फडके | विभाग पृष्ठ |
| माप्र | माझा प्रवास-गोडसे-चिं. वि. वैद्य | पृष्ठ |
| माभू | माझी भूमिका-ग. कृ. बोडस | ,, |
| माहिम | माहिमची बखर | ,, |
| मुधो | मुधोळच्या राज घराण्याचा इतिहास | सूची |
| मुमुमु | मुसलमान मुलखांतील मुशाफरी-श्री. रा. टिकेकर | पृष्ठ |
| मुरा | मुक्तेश्वर रामायण | कांड अध्याय ओवी |
| मृच्छ | मृच्छकटिक-गो. ब. देवल | पृष्ठ |
| मोहवि | मोहविलसित नाटक | ,, |
| योसं | योगसंग्राम-शेखमंहमद | अध्याय ओवी |
| रत्ना | रत्नाकर-मासिक पुणें | महिना वर्ष |
| राग्रं | राजवाडे ग्रंथमाला | पृष्ठ |
| राणीलक्ष्मीबाई | राणी लक्ष्मीबाई चरित्र | ,, |
| राणीचें पुस्तक | गणपतराव मोरोबा पितळे-१८७१ | ,, |
| राराबि | रामराज्य वियोग नाटक-किर्लोस्कर | ,, |
| लरापां-मवाइ | लक्ष्मण रामचंद्र पांगारकरकृत-मराठी वाङ्मयाचा इतिहास | विभाग पृष्ठ |
| लविसो | लग्नविधी आणि सोहळे-आलोनी | पृष्ठ |
| लशिआत्म | एका लष्करी शिपायाचें आत्मचरित्र-जनरल शिंदे | ,, |
| लाखे | लाठीचा खेळ-ल. ब. भोपटकर | ,, |
| लीच | लीला चरित्र-(महानुभावी) | ,, |
| वत्सला | वत्सलावहिनीचीं पत्रें-संदेश | ,, |
| वमो, वसमो | वसईची मोहिम-य. न. केळकर | |

| संक्षेप | ग्रंथनाम, संपादक | खुलासा |
|---|---|---|
| वलो | वऱ्हाडी लोकगीतें | ओवी |
| वाशो | वाङ्मय शोभा-मासिक | महिना वर्ष |
| विंचूइ | विंचूरकर घराण्याचा इतिहास | पृष्ठ |
| विछ | विष्णुपंत छत्रे-चरित्र ना. के. गद्रे | ,, |
| विविध | विविधवृत्त-साप्ताहिक | तारीख महिना वर्ष |
| व्यवको | व्यवहार कोश | पृष्ठ |
| व्यायाम | व्यायाम मासिक-बडोदें-द. चिं. मुजुमदार | ,, |
| व्याज्ञा | व्यायाम ज्ञानकोश | महिना वर्ष |
| डॉ. शरच्चंद्र | कादंबरी | खंड पृष्ठ |
| शामब | शामभट आणि त्याचा शिष्य बटो | पृष्ठ |
| शामब-भारत | शाहुमहाराजांची बखर-भारतवर्ष मासिक | ,, |
| शारो | शाहुमहाराजांची रोजनिशी | खंड पृष्ठ |
| श्याआ | श्यामची आई-साने गुरुजी | ,, |
| श्रुना | श्रुतिगुण नाटिका-तळेकर | ,, |
| सकाळ | सकाळ-दैनिक, पुणें | तारीख महिना वर्ष |
| संतलीला | संतलीलामृत-महिपति | अध्याय ओवी |
| सनदापत्रें | सनदापत्रें-ग. चिं. वाड | पृष्ठ |
| सन्यख | संन्यस्त खड्ग-नाटक-वि. दा. सावरकर | ,, |
| सैंन्यासं | संन्याशाचा संसार-भा. वि. वरेरकर | ,, |
| सयाजी | सयाजी महाराजांचें चरित्र-दा. ना. आपटे | विभाग पृष्ठ |
| संशाक | संगीत शास्त्रकार व कलाकार-द. ल. जोशी | पृष्ठ |
| संशोधन | संशोधन नियतकालिक-राजवाडे संशोधन मंदिर | अंक पृष्ठ |
| संशोधन ऐलेच | संशोधन-ऐतिहासिक लेख, चरित्रें इ. | ,, ,, |
| सह्याद्रि | सह्याद्रि-मासिक | महिना अंक |
| सह्यापा | सह्याद्रीच्या पायथ्याशीं | पृष्ठ |
| साब | साष्टीची बखर | ,, |
| साहित्यधारा | भाटे | ,, |
| सिसू | सिद्धान्त सूत्रें | ,, |
| सिंश | सिंहाला शह-श्रीपाद रामचंद्र टिकेकर | ,, |
| सुदेइ | सुराष्ट्र देशाचा इतिहास-गोपाळ हरि देशमुख | ,, |
| सुवाशा | सुलभवास्तुशास्त्र-रा. सं. देशपांडे | ,, |
| सूत्र | सूत्रपाठ | ,, |
| स्मृतिचि | स्मृतिचित्रें-लक्ष्मीबाई टिळक | विभाग पृष्ठ |
| स्यूत | स्यूत स्यौतिक-घारपुरे | पृष्ठ |
| स्वैसं | स्वैरसंचार | ,, |
| हनाआ-आठ | हरि नारायण आपटे यांच्या आठवणी | ,, |
| हिप्र | हिमालयांतील प्रवास-काका कालेलकर | ,, |
| ज्ञाको | महाराष्ट्रीय ज्ञानकोश | अक्षर पृष्ठ |
| ज्ञाप्र | ज्ञानप्रकाश | तारीख महिना वर्ष |